दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ३ सप्टेंबर २०२५ | अंक २५५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# मोठी आंनदाची बातमी! मराठा आंदोलनाला यश, मनोज जरांगे पाटलांनी उपोषण सोडलं

## सरकारच्या जीआरमध्ये काय आहे?

सरकारने जारी केलेला हा जीआर हैदराबाद गॅझेटसंदर्भात आहे. जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे याकरिता सन 2001 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. 23 व त्याअंतर्गत कार्यपद्धती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी केली जाईल. त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत १. ग्राम महसूल अधिकारी, २. ग्रामपंचायत अधिकारी, ३. सहायक कृषी अधिकारी असतील, असे या गॅझेटमध्ये नमूद आहे.

## स्थानिक चौकशी करून खातरजमा केली जाईल

मराठा समाजातील भुधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी 13-10-1967 पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे दिलेल्या अनुषंगिक पुराव्याचे सक्षम प्राधिकारी यांनी स्थानिक चौकशी करून खातरजमा केली जाईल, असेही शासन निर्णयात नमूद आहे.

मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला यश आले आहे. जरांगे पाटलांनी सरकारने दिलेला जीआर स्वीकारला आहे. यावेळी अभ्यासकांनी काही दुरुस्त्या सांगितल्या आहेत. त्या आरक्षण उपसमितीने स्वीकारल्या आहेत. त्यानंतर उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे पाटलांना उपोषण सोडण्याची विनंती केली. यानंतर जरांगे पाटलांनी उपोषण सोडलं आहे., असेही जाहीर केले आहे.मराठा आरक्षणाबाबत सुरु असलेले उपोषण सोडल्यानंतर



जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानही दिसत होते. उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मी आता रुग्णालयात जाणार आहे असंही त्यांना सांगितलं.

## सिंदफणाच्या क्रिकेटपटूंचा दणका! राष्ट्रीय स्पर्धेत ६ मुलींची थेट एंट्री; सी.बी.एस.ई.साऊथ झोन-२ मध्ये मारली बाजी

विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या युवा क्रिकेटपटूंनी २०२५ २६ साऊथ झोन-२ सी.बी.एस.ई. क्रिकेट स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करत राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे. या उत्कृष्ट यशामुळे शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. ध्रुव ग्लोबल स्कूल, संगमनेर येथे २७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान आयोजित या महत्त्वाच्या स्पर्धेत सिंदफणा शाळेच्या १४, १७ व १९ वर्षाखालील मुले-मुलींनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतून अनेक खेळाडूंनी पदके मिळवून शाळेचे नाव उजळवले आहे.१४ वर्षाखालील मुलांमध्ये आर्यन बनसोड याने कांस्यपदक पटकावले आहे. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मानसी



जगताप, अनन्या मुंडे, रिद्धी डाके, पूर्वा मालानी, संस्कृती मळवाडे, श्रेया जाधव आणि वेदिका गवते या सात खेळाडूंनी रौप्यपदक मिळवले आहे. तसेच या गटातीलच शेजल विभुते आणि कार्तिकी सुरवसे या दोन आणि १९ वर्षाखालील मुलींच्या गटातून आरुषी कुलकर्णी, अक्षरा सोळंके, अनुष्का सोळंके आणि रोहिणी मीटे या चार प्रतिभावान खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय क्रिकेट संघात स्थान मिळवले आहे. मध्यप्रदेशच्या भोपाळ येथे होणाऱ्या सी.बी.एस.ई. राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत हे खेळाडू महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळविली आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष मा. आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख आणि उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी, ऑगस्टन, सुनिता सुरवसे धनंजय सोमवंशी,अर्चना जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले आहे. खेळाडूंना उत्कृष्ट मार्गदर्शन करणारे मुख्य प्रशिक्षक सचिन मंजुळे, क्रीडा शिक्षक दीपक माने, पुरुषोत्तम सोळंके आणि वैशाली सोळंके यांच्या योगदानाचेही विशेष कौतुक करण्यात आले आहे. आमच्या मुली-मुलांनी दाखवलेली ही कामगिरी महाराष्ट्राच्या खेळप्रेमी जनतेसाठी अभिमानाचा विषय आहे. साऊथ झोन २ स्तरावरील या विजयाने राष्ट्रीय मंचावर आमच्या प्रतिभावान खेळाडूंना संधी मिळवून दिली आहे. मला खात्री आहे की भोपाळच्या राष्ट्रीय स्पर्धेत आमचे खेळाडू महाराष्ट्राचा झेंडा उंच फडकवतील आणि देशभरातील प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देतील.

## महसूल कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा निलंबन मागे घ्या अन्यथा आंदोलन करणार

महसूल कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींचा कसलाही विचार न करता जिल्हाधिकारी यांनी चक्क कर्मचाऱ्यांचे निलंबन केले आहे. ही एकतर्फी कारवाई मागे घेऊन निलंबन रद्द करावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यामुळे महसूल मध्ये आता जिल्हाधिकारी विरुद्ध कर्मचारी असे आंदोलन पाहण्यास मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हाधिकारी यांनी पदभार घेतल्यापासून जिल्ह्यात महसूलच्या कामात गती वाढली आहे. पण अनेक कर्मचाऱ्यांना ग्रामीण भागात काम करावे लागते, यामुळे येथे इंटरनेट स्पीड मिळत नाही, वीजपुरवठा खंडित झाला तर जनरेटर, इन्व्हर्टरची सोय नसल्याने कामांचा खोळंबा होतो. यामुळे कामे रखडून पडतात. पण या अडचणींचा विचार न करता आणि कर्मचाऱ्यांचे म्हणणे ऐकून न घेता एकतर्फी कारवाई करीत निलंबित करण्यात आले. तसेच कर्मचारी अभिजीत दहिवाळ, सहायक महसूल अधिकारी यांचे भावाचे निधन, वडीलांना पॅरालीसीस अशा कुटुंबात घटना घडलेल्या असतांना व तो कौटुंबीक दुःखात असताना त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. त्यांनी कोणतेही गैर कृत्य केले नाही. तसेच अतुल केदारे यांचे व इतर कर्मचाऱ्यांवर केलेली निलंबनाची कारवाई मागे घेण्यात यावी अशी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आह

## पोलिसाच्या अंगावर चारचाकी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न

नित्रुड येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या वेळी भरधाव वेगाने घुसणारी एक्सयूव्ही ५०० क्रमांक एम. एच. १४ डीटी ३५१४ रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या हवालदारावरच चालकाने गाडी घालून फरफटत नेल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत पोलीस हवालदार गंभीर जखमी झाला असून आरोपी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युवराज प्रल्हाद श्रीडोळे (वय ३६) असे त्या जखमी हवालदाराचे नाव आहे. युवराज श्रीडोळे हे सध्या दिंद्रुड (ता. माजलगाव) ठाण्यात नेमणुकीवर आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ३० ऑगस्ट रोजी ते पोलीस उपनिरिक्षक राठोड, पो.ह. बाहीरवाळ, साळुंके, होमगार्ड धायजे या सहकाऱ्यांसह नित्रुड गावात अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त बंदोबस्ताचे कर्तव्य पार पाडत होते. काळ्या रंगाची एक्सयूव्ही ५०० गाडी पोलिसांच्या गाडीच्या सायरन सायरनसारखा आवाज करत बेदरकारपणे भरधाव वेगाने आली. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी पोलिसांनी चालकास लांबूनच हात दाखवून वाहन थांबवून बाजूला घेण्याचा इशारा केला. मात्र, मस्तवाल चालकाने पोलिसांच्या अंगावरच वाहन घातले. यावेळी वाहन रोखण्यासाठी समोर आलेले युवराज श्रीडोळे यांना चालकाने जवळपास ८० मीटर फरफटत नेत गंभीर जखमी केले आणि गाडीसह पळून गेला. जखमी झालेल्या श्रीडोळे यांना त्यांचे सहकारी आणि उपस्थित नागरिकांनी रुग्णालयात दाखल केले.

## हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी – मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

आगामी 17 सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्मारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक 1 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन



आवश्यक कामांची तपासणी केली .यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते .प्रशासनाने स्मारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . 17 सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले . .

## बसमधून उतरताना चाकाखाली अल्याने स्वारातीच्या महिला कर्मचाऱ्याचा मृत्यू

शहरालगत मोरेवाडी परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. विजयमाला नानाभाऊ सरवदे (वय ५७, रा. केज) असे मृत महिलेचे नाव आहे.



त्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून मागील ३५ वर्षापासून त्या कार्यरत होत्या. विजयमाला सरवदे नोकरीच्या निमित्ताने दररोज केजहुन अंबाजोगाईला ये-जा करत असत. आज सकाळी देखील त्या अंबाजोगाईला येण्यासाठी धारूरहून परळीच्या दिशेने निघालेल्या बसमध्ये (एमएच १४ एमएच २३४७) बसल्या. या बसने अंबाजोगाई येथे थांबा घेतल्यावर विजयमाला सरवदे या उतरू लागल्या. त्यावेळी त्यांच्या साडीचा पदर बसमध्ये अडकला आणि त्या खाली कोसळल्या. इतक्यात बस पुढे निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले. तत्काळ त्यांना गंभीर जखमी अवस्थेत स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारा पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे रुग्णालयात शोककळा पसरली असून सहकारी कर्मचारी आणि स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत. दरम्यान, अपघातावेळी बस चालक नशेत होता, त्याच्या बेजबाबदारपणामुळे हा अपघात झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या अपघातासाठी जबाबदार असलेल्या बस चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी मयत महिलेच्या नातेवाईकांनी केली आहे.

## मराठा आरक्षण ;गेवराईसह ग्रामीण भागात गुलालाची उधळण करुन फटक्यांची आतिषबाजी

### मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला यश

गेवराई :मराठा आरक्षण या प्रमुख मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेल्या मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला अखेर यश आले असून सरकारने मागण्या मान्य करुन जरांगे पाटलांनी “आपण जिंकलो” अशी घोषणा करताच शहरातील चौका चौकात तसेच ग्रामीण भागात मराठा समाज बांधवांनी फटाक्यांची आतिषबाजी करत गुलालाची उधळण करुन जल्लोष साजरा केला.

मराठा आरक्षणासाठी मागील अनेक वर्षांपासून मनोज जरांगे पाटलांनी लढा उभारलेला असून जरांगे पाटलांच्या मराठा आरक्षणाच्या लढ्यास अखेर यश आले असून मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्या मान्य



झाल्याचे मनोज जरांगे पाटलांनी घोषणा करताच मराठा समाज बांधवांनी ढोल ताशांच्या तालावर नाचत जल्लोष साजरा केला. यावेळी गुलालाची उधळण, तोफासह फटाक्यांची अतिष बाजी करत जरांगे पाटलांचा विजय असो असा जयघोष करत गावागावात मोठा जल्लोष साजरा करताना मराठा बांधव दिसून आले. शासनाने मराठा आरक्षण संदर्भात मनोज जरांगे पाटलांच्या सर्व मागण्या मान्य केल्याने हा जल्लोष साजरा करण्यात येत असल्याचे मराठा समाज बांधवांनी यावेळी बोलताना सांगितले.

### जरांगे पाटलांच्या पाच मागण्या सरकारकडून मान्य

१)हैदराबाद गॅझेटियरला मंत्रिमंडळे उपसमितीची मान्यता
२) मराठा आंदोलकांवरील सर्व गुन्हे सप्टेंबरअखेर मागे घेणार
३) सातारा गॅझेटियर महिन्याभरात लागू करणार
४) आंदोलनासाठी बलिदान देणाऱ्यांना सरकार 15 कोटींची मदत देणार
५) ५८ लाख कुणबी नोंदींच्या याद्या ग्रामपंचायतीत लावणार

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बुधवार ३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## दररोज सकाळी रिकाम्या पोटी सुके नारळ खाल्ल्याने शरीरात काय बदल होतात



नारळ असो किंवा मग नारळ पाणी आपल्यासाठी किती महत्त्वाचं असतं हे आपल्या सर्वांनाच माहित आहे. एवढंच नाही तर नारळ तेलही आपल्या ब्यूटी रेमीडीमध्ये आपण वापरतो.पण ते नारळ पाणी असो, नारळाचे तेल असो, नारळाचा गर असो किंवा सुका नारळ असो. अगदी त्याची पानेही अनेक गोष्टी बनवण्यासाठी वापरली जातात. अनेकांना हे माहित नसेल की, जर दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ किंवा सुके नारळ खाल्ले तर त्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो? काय फायदे मिळतात? चला जाणून घेऊयात ऊर्जा वाढवण्यासाठी उपयुक्त नारळामध्ये हेल्थी फॅट्स असतात. हे फॅट्स शरीराला ऊर्जा देण्याचं काम करतात. अशा परिस्थितीत, सकाळी रिकाम्या पोटी कोरडे म्हणजे सुका नारळ खाल्ल्याने शरीर दिवसभर ऊर्जावान राहते आणि थकवा कमी होतो. व्यायाम करणाऱ्या किंवा रोजच्या धावपळीच्या जीवनशैली जगणाऱ्या लोकांसाठी नारळ विशेषतः फायदेशीर आहे. त्यामुळे शरीराला आलेला थकवा जाणवत नाही. पचनासाठी फायदेशीर नारळामध्ये फायबर आणि नैसर्गिक प्रोबायोटिक्स असतात जे आतड्यांचे आरोग्य सुधारतात. अशा परिस्थितीत, दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ खाल्ल्याने पचन सुधारते. यामुळे बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि अपचन यासारख्या समस्या कमी होऊ शकतात. रोगप्रतिकारशक्ती वाढवते नारळामध्ये लॉरिक ॲसिड असते जे शरीराला विषाणू, बॅक्टेरिया आणि संसर्गाशी लढण्यास मदत करते. याशिवाय, त्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. नारळ नियमितपणे खाल्ल्याने सर्दी आणि खोकला सारख्या आजारांचा धोका कमी होतो. त्वचेसाठी नैसर्गिक मॉइश्चरायझर नारळातील निरोगी फॅट्स त्वचेला आतून हायड्रेट ठेवतात. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार राहते. नारळाचे तेल नैसर्गिक मॉइश्चरायझर म्हणून देखील काम करते आणि मुरुमे, कोरडेपणा आणि तेलकट त्वचेच्या समस्या कमी करते. रक्तातील साखर नियंत्रित ठेवते नारळाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी तो एक चांगला पर्याय आहे. त्यात असलेले इन्युलिन फायबर रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करते. अशाप्रकारे, नारळ तुमच्यासाठी एक सुपरफूड म्हणून काम करू शकते. तसेच तुम्ही वर्षभर तुमच्या आहारात त्याचा समावेश करू शकता.

# विक्रम-32 भारतीय स्वनिर्मित सेमी कडंक्टर भारताच्या तंत्रज्ञान स्वावलंबनाची नवी क्रांती

**लेख : संजय पाटील,** एस्सेनेट टेक्नॉलॉजीज, नाशिक

२ सप्टेंबर २०२५ हा दिवस भारतासाठी ऐतिहासिक ठरला. बेंगळुरूमध्ये झालेल्या सेमिकॉन इंडिया २०२५ परिषदेत देशाचा पहिला पूर्णपणे स्वदेशी मायक्रोप्रोसेसर "विक्रम-३२" पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर करण्यात आला. हा क्षण भारताच्या तंत्रज्ञान स्वावलंबनाचे प्रतीक ठरला. केंद्रीय आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा प्रोसेसर "Designed & Made in India, Trusted by the World" या संदेशासह अर्पण केला. आजवर भारत परदेशी कंपन्यांच्या चिप्सवर अवलंबून होता. मोबाईल, संगणक, उपग्रह, संरक्षण, ऑटोमोबाईल अशा क्षेत्रांत सेमीकंडक्टरची मोठी गरज असते. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनाची ही सुरुवात तांत्रिकच नव्हे तर आर्थिक व धोरणात्मक स्वातंत्र्याचा टप्पा मानला जातो. विक्रम-३२ हा भारताचा पहिला ३२-बिट स्वदेशी प्रोसेसर आहे. त्याची रचना व निर्मिती इस्रोच्या Semiconductor Laboratory मध्ये झाली आहे. भारतीय वैज्ञानिकांनी पूर्णपणे आपली कौशल्ये वापरून हा प्रोसेसर तयार केला आहे. या चिपचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची विश्वासार्हता आणि कठीण परिस्थितीतही काम करण्याची क्षमता. उपग्रह, संरक्षण, वैज्ञानिक संशोधन अशा संवेदनशील क्षेत्रांसाठी ही चिप अतिशय उपयुक्त आहे. यामुळे आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला मोठे बळ मिळाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या प्रसंगी भाषण करताना सेमीकंडक्टरचे महत्त्व वर्णन केले. त्यांच्या मते, "२१व्या शतकातील तेलापेक्षा मौल्यवान वस्तू म्हणजे सेमीकंडक्टर, हे खरे तर डिजिटल डायमंड्स आहेत." त्यांनी भारत आज केवळ ग्राहक न राहता निर्माता बनत असल्याचे सांगितले. डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांचा पाया हाच आहे. मोदींनी वैज्ञानिक व अभियंत्यांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या म्हणण्यानुसार या चिप्स भारताच्या संरक्षण, अंतराळ, औद्योगिक आणि ऊर्जा क्षेत्रांसाठी नवे दरवाजे उघडतील. विक्रम-३२ चा उपयोग अत्यंत जटिल गणना, उच्च कार्यक्षमता आणि सुरक्षित डेटा प्रक्रियेसाठी होणार आहे. DRDO, इस्रो, औद्योगिक उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उच्च कार्यक्षम संगणन या सर्व क्षेत्रांत त्याचा वापर केला जाणार आहे. उपग्रह मोहिमा, क्षेपणास्त्र नियंत्रण प्रणाली, सायबर सुरक्षा आणि डिजिटल पायाभूत सुविधा यासाठी विश्वासार्ह चिपची गरज असते. त्यामुळे हा प्रोसेसर भारताच्या सुरक्षिततेसाठीही महत्त्वाचा ठरेल. अमेरिका, तैवान, दक्षिण कोरिया, चीन यांसारख्या देशांतच चिप उत्पादन होते. अशा स्थितीत भारताने स्वदेशी चिप तयार करणे म्हणजे तांत्रिक स्वावलंबनाची मोठी झेप आहे. या परिषदेच्या माध्यमातून सरकारने सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी आखलेल्या व्यापक धोरणांची माहिती दिली. इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत मोठी गुंतवणूक, संशोधन सुविधा, कर प्रोत्साहन आणि जागतिक भागीदारीचा आराखडा मांडण्यात आला आहे. गुजरातमधील सानंद येथे उभारलेल्या OSAT सुविधेतून लवकरच मेड-इन-इंडिया चिप्स बाजारात येणार आहेत. मोदींनी जाहीर केले की "२०२५ च्या शेवटी पहिल्या चिप्स ग्राहकांपर्यंत पोहोचतील."

भारताचा हा सोपा नव्हता. चिप निर्मिती ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यासाठी अब्जावधी रुपयांची गुंतवणूक, उच्च दर्जाच्या प्रयोगशाळा व जागतिक तज्ज्ञांचे सहकार्य आवश्यक असते. आतापर्यंत भारत आयटी सेवा



आणि सॉफ्टवेअरमध्ये आघाडीवर होता; परंतु हार्डवेअर विशेषतः सेमीकंडक्टर उत्पादनात मागे होता. विक्रम-३२ मुळे ही कमतरता भरून निघत आहे. यामुळे आयातीवरील अवलंबन कमी होऊन रोजगारनिर्मिती वाढेल. जगभरात सेमीकंडक्टर उद्योगाला रणनीतिक महत्त्व आहे. कोविड-१९ च्या काळात चिप्सच्या तुटवड्याने अनेक उद्योग ठप्प झाले. याच पार्श्वभूमीवर भारताने आत्मनिर्भरतेची दिशा स्वीकारली. विक्रम-३२ ही त्या प्रवासातील पहिली ठोस उपलब्धी आहे. यामुळे भारत भविष्यात केवळ आपल्या गरजा पूर्ण करणार नाही तर निर्यातीतही वाटचाल करू शकेल. या यशामुळे जागतिक गुंतवणूकदार भारतावर अधिक विश्वास ठेवतील. या प्रकल्पामागे इस्रो, DRDO आणि देशभरातील संशोधन संस्थांचा मोठा वाटा आहे. डिझाईनपासून उत्पादनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया देशांतर्गत झाली. शेकडो वैज्ञानिक आणि अभियंत्यांनी अथक परिश्रम करून हे यश मिळवले. त्यामुळे भारतातील विद्यार्थ्यांना व संशोधकांना नवी प्रेरणा मिळेल. देशातील महाविद्यालयांत सेमीकंडक्टर अभ्यासक्रम सुरु होतील. पुढील दशकात हजारो कुशल तंत्रज्ञांची गरज भासेल. त्यामुळे विक्रम-३२ हा केवळ प्रोसेसर नसून भावी पिढ्यांसाठी संधीचा दरवाजा आहे. सरकारने या क्षेत्रासाठी PLI योजना सुरु केली आहे. गुंतवणूकदारांना करसवलती, वीज, पाणी, जमीन अशा सुविधा दिल्या जात आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात उत्पादन केंद्रे उभारण्यासाठी उत्सुक आहेत. पुढे ५ नॅनोमीटर व त्याहून अत्याधुनिक चिप्सची निर्मिती करणे हे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे भारत केवळ ग्राहक राहणार नाही तर तंत्रज्ञान पुरवठादार बनेल. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही हे पाऊल महत्त्वाचे आहे. परदेशी चिप्समुळे डेटा लीक, सायबर हल्ल्यांचा धोका असतो. स्वदेशी चिप्समुळे हे धोके कमी होतील. क्षेपणास्त्र, उपग्रह संप्रेषण व लष्करी संगणक प्रणाली आता अधिक सुरक्षित होतील. ५G, ६G, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन यांसाठीही स्वदेशी चिप्स निर्णायक ठरतील. यामुळे भारत जागतिक स्तरावर विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयास येईल. आर्थिक दृष्टीनेही या प्रकल्पामुळे प्रचंड रोजगारनिर्मिती होईल. २०३० पर्यंत सेमीकंडक्टर बाजाराचा आकार ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. भारतातील MSME उद्योग या साखळीत सहभागी होऊ शकतात. यामुळे शहरी व ग्रामीण भागातही रोजगार निर्माण होईल. आयातीवरील खर्च कमी झाल्याने परकीय चलनाची बचत होईल.

एकूणच, विक्रम-३२ चिप हा भारताच्या तंत्रज्ञान इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. हे केवळ एक उत्पादन नाही, तर आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. यामुळे भारत स्वतंत्र, विश्वासार्ह आणि स्पर्धात्मक राष्ट्र म्हणून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करेल. मोदींनी योग्यच म्हटले की, "आजचा दिवस भारताच्या भविष्यातील डिजिटल सामर्थ्याची नांदी आहे." विक्रम-३२

# भालचंद्र माने यांना पत्रकार पदविका

नवी मुंबई : भारत सरकार मान्यता प्राप्त, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर वृत्तपत्रकार संस्था(संघ) यांच्या विद्यमाने झालेल्या वृत्तपत्र विद्या पदविका परीक्षेत नेरुळ येथील भालचंद्र विनायक माने यांना प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल पत्रकार पदविका प्रदान करण्यात येत आहे. सदर पत्रकार पदविका प्रदान समारंभ रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी रोटरी क्लब सभा, नाशिक येथे नरहरी जिरवाळ, अन्न व औषध प्रशासन मंत्री (महाराष्ट्र शासन), पद्मश्री चैत्राम जी. पवार निसर्ग व पर्यावरण संरक्षक, धुळे, दिनेश भोईर संस्थापक अध्यक्ष, दिनेश भागीरथ भोईर सामाजिक प्रतिष्ठान व सौ. कृतिका संदीप मराठे, संचालिका, पत्रकार पत्रिका कोर्स. यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार पदविका कोर्स श्रीमती कृतिका देशपांडे यांनी खूप सखोलपणे अभ्यासक्रम तयार केला असून या कोर्समध्ये वृत्तपत्रिकेचा इतिहासाबरोबरच आधुनिक व्हिडिओ एडिटिंग, लघुलेखन, ऑडिओ कंटेंट, मॅनेजमेंट, वेब डिझाईन या सोबत संशोधन तपास मुलाखत, अहवाल देणे, लेखन अशा अनेक गोष्टी बरोबर पत्रकारांना संपूर्ण पत्रकारिता करण्याचे ज्ञान, कायदेशीर बाबीसह पत्रकारिता, पुस्तकाद्वारे विषयातील अभ्यासक्रम आणि व्हाट्सअप च्या संदेशाद्वारे माहिती देऊन तसेच आखणी बंद प्रश्नपत्रिका द्वारे परीक्षा घेऊन उत्तीर्ण पत्रकारांना शासन मान्यताप्राप्त पदवीदान प्रदान करण्यात येते. यामुळे पत्रकारांना आत्मविश्वासासह समाजसेवेसाठी हे उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. शालेय शिक्षणापासून भालचंद्र माने यांना वाचन, लेखन याची आवड होती. नवी मुंबईतील पत्रकार सुभाष हांडे देशमुख यांनी मला प्रोत्साहित केले आणि थोडे बहुत लिहिता लिहिता माझी पत्रकारिता वृद्धिंगत होत गेली. असे प्रांजळपणे सांगत भालचंद्र माने सांगतात की दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था यांची जाहिरात फेसबुकवर पाहिल्यानंतर तेथे संपर्क साधला व श्रीमती कृतिका संदीप मराठे यांनी पत्रकार कोर्स बद्दल मोलाचे मार्गदर्शन केल्यानंतर सदर कोर्स पूर्ण केला. चांगल्या गुणवत्तेने पास झाल्याने आणि खूप माहिती गाठीशी आल्याने मला पत्रकारिता करण्याकरता आत्मविश्वास अधिक दृढ झाला.

## आदिवासींच्या नेत्या प्रतिभाताई शिंदे यांचा उज्जैनकर फाउंडेशन तर्फे सत्कार

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी नुकतीच लोक संघर्ष मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मा. प्रतिमाताई शिंदे यांची जळगाव येथे त्यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली याप्रसंगी डॉ. उज्जैनकर यांनी मा.प्रतिमाताई शिंदे यांचा गुलाब बुके देऊन सत्कार केला प्रतिमाताई शिंदे या अनेक वर्षापासून आदिवासी बंधू भगिनींच्या ज्वलंत प्रश्नांकडे व त्यांच्या न्याय हक्कांसाठी शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध मोर्चे आंदोलने करीत आहेत आदिवासींच्या नेत्या



म्हणून त्यांचे नावलौकिक आहे डॉ. उज्जैनकर यांनी अनेक वेळा प्रतिभाताई यांची भेट घेऊन विविध सामाजिक कार्याविषयी चर्चा केलेली आहे प्रसंगी ताईंनी उज्जैनकर फाउंडेशनच्या अखंड यशस्वी कार्याबद्दल चर्चा करून अभिनंदन केले डॉ.उज्जैनकर हे गेल्या 27 वर्षापासून नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर येथे शिक्षक म्हणून कार्य करत आहे तरी देखील नोकरी सांभाळून त्यांनी गेल्या 25 वर्षापासून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक ,कला ,आरोग्य अशा विविध क्षेत्रांमध्ये नेत्र दीपक कार्य करीत आहे याविषयी प्रतिमाताई शिंदे यांनी डॉ. शिवचरण उज्जैनकर यांचे मनापासून अभिनंदन व कौतुक केले.

# नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कर्मचारी श्री दिनेश खैरे काव्यभूषण सन्मान पुरस्कार २०२५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय (रजि.) संचलित साहित्यरंग साहित्यमंच, नाशिक आयोजित साहित्य महोत्सव २०२५ नाशिक येथे पुरस्कार वितरण आणि कवी संमेलन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे येथील नामांकित शिक्षण संस्था नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी नवोदित कवी, लेखक, श्री दिनेश ताराचंद खैरे .यांना काव्यभूषण सन्मान पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी स्थळ आजीचं पुस्तकाचं हॉटेल, मुंबई आग्रा महामार्ग, दहावा मैल, ओझर, नाशिक या ठिकाणी कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. स्वाती संजय सोनवणे (सामाजिक कार्यकर्त्या), उद्घाटक, मा. श्री सुभाष टिपरे सर (ज्येष्ठ साहित्यिक), प्रमुख पाहुणे, मा. श्री माणिकराव गोडसे ( ज्येष्ठ कवी), संमेलनाच्या अध्यक्षा मा. सुनंदा साहेबराव पाटील (ज्येष्ठ कवयित्री), माननीय श्री सुशील कुमार देवराम शिंदे (शिवव्याख्याते, कायद्या अभ्यासक), निवेदक, मा. भाग्यश्री




प्रवीण जाधव यांच्या शुभ हस्ते साहित्य क्षेत्रातील प्रसिद्ध समजला जाणारा काव्यभूषण सन्मान पुरस्कार २०२५ आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.श्री दिनेश खैरे हे मितभाषी,मृद स्वभावाचे, सेवा कार्यतत्पर,कवी लोकसाहित्य म्हणून सुपरिचित आहेत. सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा वावर आहे. त्यांची दोन पुस्तके सुद्धा प्रकाशित आहेत. यापूर्वी त्यांना अनेक राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेक मानसन्मान सोहळे झाले आहेत.श्री दिनेश खैरे यांना मॉर्डन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मा. प्रा.श्री सचिन सानप (सर), नोरोसजी वाडिया म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्री वसंत चाबुकस्वार(सर), माजी प्रबंधक, श्री राजेंद्र तागडे(सर), डॉ. प्रकाश चौधरी (सर),डॉ. श्री. लक्ष्मण चौधरी (सर), डॉ.श्री अशोक उबाळे (सर) सहसंचालक(उच्च शिक्षण) विभाग पुणे, डॉ. अर्चना बोऱ्हाडे (मॅडम) प्रशासन अधिकारी(उच्च शिक्षण )विभाग पुणे. श्री अरविंद भागवत सर,श्री माणिक मुंडे सर,श्री बाळासाहेब पोटे सर,श्री विनायक चव्हाण सर,श्री विजय सावरतकर सर,माजी गटशिक्षणाधिकारी श्री ए.बी. पाटील सर,प्रा.सौ संजीवनी पाटील (मॅडम),श्री नामदेव गवळी सर,श्री सुरेश पाटील सर,श्री राजाराम साधले सर,श्री देवदास जामदार गुरुजी,श्री शिवाजीराव हराळे म ास्तर, श्री सतीश गोगावले,श्री राम यादव सर,आदींचे मार्गदर्शन लाभले. सामाजिक शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल काव्यभूषण सन्मान पुरस्कार २०२५ मिळाल्याबद्दल श्री दिनेश ताराचंद खैरे यांचे समाजाच्या विविध थरातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छा वर्षाव होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## आदर्श शिक्षक, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन



शिक्षणाच्या ज्योतीतून अज्ञानाचा अंधार दूर करत नवभारताची सुशिक्षित पिढी घडविणा-या सर्व शिक्षकांना, विद्यार्थ्यांना आणि समस्त भारतीयांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

राष्ट्र निर्मितीचा मूळ पाया घालणारी एकच व्यक्ती म्हणजे शिक्षक होय.आणि ते व्यक्ती म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होय, यांचा जन्मदिन, हा शिक्षक दिन म्हणून साजरा करतात.ते कुशल वक्ते, थोर विचारवंत, विद्वान,उत्तम लेखक व आदर्श शिक्षक होते.त्याचे शिक्षणावरील प्रेम आणि विद्वत्तेमुळेच आपल्या भारत देशात त्यांचा जन्म दिवस हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.त्यांनी भारताचे राष्ट्रपती व थोर शिक्षकतज्ञ म्हणून जगात त्यांनी ख्याती मिळविली होती. 5 सप्टेंबर 1888 रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे जन्मगाव मद्रास प्रांतातील तिरूतानी येथे झाला लहानपणापासून ते अतिशय हुशार होते. विविध शिक्षण संस्थांमधून टप्प्या टप्प्याने शिक्षण पूर्ण करीत ते एम. ए.झाले पुढे मद्रास ,मैसूर ,कोलकत्ता इत्यादी ठिकाणी त्यांनी तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. पुढे ते आंध् विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले

इंग्रजी भाषेवर त्यांचे अत्यंत प्रभुत्व होते.ते तत्त्वज्ञान हा अतिशय अवघड विषय सोपा करून शिकवीत असत. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांच्या प्रमाणे परदेशातही भारतीय संस्कृतीची ओळख सर्वांना करून दिली. हिंदू तत्वज्ञानावरील त्यांची भाषणे परदेशात खूप गाजली. काही दिवस त्यांनी परदेशात प्राध्यापक म्हणूनही काम केले.काही काळ ते बनारस विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत होते.

आपला भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर रशियात भारताचे वकील म्हणून ते राहिले. तसेच भारताचे उपराष्ट्रपती म्हणूनही त्यांच्यावर जबाबदारी होती. भारताचे राष्ट्रपती होण्याचा मानही त्यांना मिळाला.जगातील थोर तत्त्ववेत्ते म्हणून ते प्रसिद्ध झाले . संपूर्ण भारतात त्यांचा जन्मदिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आदर्श शिक्षकांचा गौरवही याच दिवशी केंद्र शासन व राज्य शासनातर्फे करण्यात येतो. स्वतःपेक्षा आपल्या कामाला श्रेष्ठत्व द्यावे हे सांगण्यासाठीच आदरणीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांची ख्याती आहे.

खरतर शिक्षक दिन हा राष्ट्राचे भविष्य घडविणा-या शिक्षकांचा सन्मान आहे.आजचा दिवस आपल्या शिक्षकाबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे.

शिक्षक व विद्यार्थ्यांचे नाते अतूट असते.शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा निर्माता आहे.कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोव्याला आकार देऊन सुंदर मडके बनवतो,त्याप्रमाणे शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देत असतो. खर पाहिले तर शिक्षक आज भावी पिढीचे शिल्पकार आहेत. शिक्षण हाच देशाच्या विकासाचा खरा मूलमंत्र आहे.शिक्षक हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे.यामध्ये शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतो.समाजात घडणाऱ्या वाईट चालीरीती,रूढी परंपरा बंद करून समाज प्रबोधनाचे कार्य हे फक्त शिक्षकच करू शकतात. आणि त्यात शिक्षकांची भूमिका फार मोलाची आहे. ज्याप्रमाणे माळी झाडाची काटछाट करून त्याला सुंदर बनविते, त्याप्रमाणे शिक्षकही आपल्या विद्यार्थ्यांचे दुर्गून दूर करून त्यांच्यात सदगुणांचा विकास घडवून आणतात. म्हणूनच आज आदर्श शिक्षक बनने ही काळाची गरज आहे.

**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**
**मु.कुरखेडा जि.गडचिरोली**

# श्री. जय श्रीराम गणेश मंडळा मार्फत प्रबोधनात्मक काव्य मैफिल उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)- दिनांक 31ऑगस्ट 2025 रोजी श्री. जय श्रीराम गणेश मंडळ श्रीराम नगर, पाटोदा रोड, छत्रपती संभाजीनगर आयोजित प्रबोधनात्मक काव्य मैफिल उत्साहात संपन्न झाली. गणेश भक्तांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील नामांकित कवी आणि कवयित्रीच्या बहारदार काव्यरचनांनी माणसाच्या मनाचा ठाव घेतला.


कवी, लेखक, समीक्षक श्री विजयकुमार पांचाळ, कवयित्री गायिका सौ. सुनितिताई गोविंद कपाळे, कवी, समुपदेशक श्री रोहिदास शिखरे , कवी, निवेदक प्रा.डॉ. सुशील सातपुते, कवी, व्याख्याते श्री दिपक नागरे, कवी प्रफुल्ल गोसावी यांनी सामाजिक वास्तव,



नात्याशी नाळ जोडणाऱ्या कविता, विनोदातून विडंबन करणाऱ्या रचना घेऊन रसिकांची मने जिंकली. समाजाला दिशा देणारा हा उपक्रम सर्वांनाच एक आगळा वेगळा संदेश देणारा आहे. डीजेच्या तालावर नाचणेच केवळ उत्सव नाही तर समाजाचे प्रबोधन होऊन समाजाला दिशा व डोळस बनवणारे उपक्रम हे कलेच्या माध्यमातून गणेशोत्सवात झाले पाहिजे, असा सूर रसिक श्रोत्यांमधून ऐकावयास मिळाला. अशा उत्सवांमध्ये शब्दांचा गाभारा, भावनांच्या संगती, काव्य कलेची सांगड, प्रबोधनाची जोड ही रसिक मनाला जोडल्या जाऊ शकते आणि तिला प्रचंड प्रमाणात दाद मिळू शकते, लोकांच्या हृदयापर्यंत ती पोहोचू शकते हे एक समाज जागृतीचे फार मोठे कार्य या मैफिलीतून हे कवी, कलाकार करीत आहेत, असे मत भक्त भाविक, रसिकांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. या मैफिलीचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुशिल सातपुते यांनी केले. श्री.जय श्रीराम गणेश मित्र मंडळाची आयोजन समिती यांनी या यशस्वी काव्यमैफिलीसाठी परिश्रम घेतले.

# "समाजप्रबोधनाचा अखंड दीप — ह. भ. प. बापूसाहेब ढगे महाराज" युवक आधार समाजरत्न पुरस्कार जाहीर

(प्रतिनिधी): समाजजागृती, व्यसनमुक्ती आणि भक्तीमार्ग प्रसारासाठी आयुष्य अर्पण करणारे आष्टी तालुक्यातील पारोडी येथील ह. भ. प. बापूसाहेब ढगे महाराज यांना यंदाचा दैनिक युवक आधार समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव होत असून पारोडी व बोरुडी सह संपूर्ण आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ह. भ. प. बापूसाहेब ढगे महाराज हे आनंद संप्रदायाचे तेजस्वी प्रवर्तक असून, परम पूजनीय बंडू बाबा महाराज यांच्या प्रेरणेने व परम पूजनीय नाना महाराज वाघमारे यांच्या कृपाशीर्वादाने त्यांनी वयाच्या २५व्या वर्षी आनंद संप्रदायाचा अनुग्रह स्वीकारला. त्या क्षणापासून त्यांनी भक्तिमार्ग, समाजप्रबोधन आणि व्यसनमुक्त समाजनिर्मिती



यासाठी आपले जीवन समर्पित केले. महाराजांनी कीर्तन व प्रवचनांच्या माध्यमातून शेकडो गावे पालथी घातली आहेत. त्यांच्या प्रबोधनपर कीर्तनांमुळे असंख्य तरुण व्यसनाच्या गर्तेतून बाहेर पडून भक्तीमार्गाकडे वळले. समाजातील दुरावलेले घटक एकत्र आणणे, शांतता, सद्भावना आणि अध्यात्माची शिकवण देणे हे त्यांचे ध्येय ठरले आहे. त्यांच्या कार्याचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे बोरुडी येथे उभारलेले परम पूजनीय बंडू बाबा महाराजांचे मंदिर, जे आज हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. तसेच पारोडी येथे ते गेली सलग बारा वर्षे आनंद संप्रदायाचा वैष्णव मेळावा आयोजित करीत आहेत. या मेळाव्यामुळे आष्टी तालुक्यात अध्यात्मिक व सामाजिक वातावरण अधिक बहरत आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण समाजकार्यासाठी आणि प्रबोधनात्मक योगदानासाठी दैनिक युवक आधार समाजरत्न पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार ७ सप्टेंबर रोजी न्यू पनवेल, सेक्टर ७ शबरी हॉल येथे आयोजित कार्यक्रमात आयबीएन 18 लोकमतचे सहसंपादक मा. श्री. विलास बडे आणि स्टार प्रवाहवरील प्रसिद्ध मालिका हळद रुसली, कुंकू हसलं फेम अभिनेत्री माधवी जुवेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संपादक संतोष आमले यांनी दिली आहे. या पुरस्कारामुळे आनंद संप्रदायातील सर्व भाविकांमध्ये आणि आष्टी तालुक्यात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, बापूसाहेब ढगे महाराज यांच्या कार्याचा गौरव होणे ही संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी बाब ठरली आहे.

# जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी मनिषाताई चवरे यांची निवड

म्हसोबावाडीः मराठा सेवा संघाचा स्थापना दिवस आणि ३५ वा वर्धापन दिनानिमित्त बीड येथे रविवार दि ३१ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्ह्याच्या कार्याध्यक्षपदी मनिषाताई महेश चवरे तर बीड जिल्हा संघटकपदी ड. निर्मलाताई विलास सोनवणे यांची निवड करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई माने आणि जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा प्रा. संगीताताई शिंदे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन निवड केली. या प्रसंगी एम.बी.बी.एस. परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक ठाकरे हे होते. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक गोविंद कदम, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे, डॉ. उर्मिलाताई शिंदे, डॉ. शरद शिंदे आदी मान्यवर तर महिला, पुरूष, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडादिनी रोटरी क्लबने केला ग्राऊंडवर जाऊन खेळाडूंचा गौरव

गेवराई । प्रतिनिधी भारताला ऑलिम्पिकमध्ये सलग सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या हॉकी संघाचा कर्णधार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या संचालक व सदस्यांनी क्रीडांगणावर जाऊन राष्ट्र ीय व राज्य खेळाडू ंचा गौरव केला.यावेळी शेकडो विद्यार्थी खेळाडू मैदानावर उपस्थित होते. २९ ऑगस्ट हा दिवस मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीदिनी संपूर्ण भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो . त्यानिमित्त गेवराई रोटरी क्लब च्या संचालक व सदस्यांनी पाऊस सुरू असतानाही जगदंबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात शारदा स्पोर्ट्स कॅडमीच्या मैदानावर सायंकाळी जाऊन कबड्डी, खो -खो , सॉफ्टबॉल, थॅलॅटिक्स व इतर खेळातील राष्ट्रीय व राज्य खेळाडूंचा सन्मान करण्यात आला . सुरुवातीला हॉकीचे



जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कबड्डीचे एनएसआय कोच डॉ . केतन गायकवाड,शुभम कादे ,राष्ट्रीय व राज्य खेळाडू बाळु आडे, गणेश यादव, ज्ञानेश्वर धापसे , भरत यादव , सॉफ्टबॉलचा गौतम बोरूडे, खो - खो चे तेजस्विनी जंगले, प्रतीक्षा येवले, ज्ञानेश्वरी काळम, ऋतुजा वाघमारे, अभिजीत हिवाळे, वेदांत काळे, सुशांत नलवडे, करण मोमीन, ऋतिक करे, निशांत तळवडे , विजय धुरंधरे आदी खेळाडूंचा यावेळी सन्मान करण्यात आला . याच कार्यक्रमात राष्ट्रीय खेळाडू व कोच डॉ . केतन गायकवाड, विजय जाहेर ( खो - खो ), प्रा .डॉ .रविंद्र खरात (थलेटिक्स ), सचिन मोहिते ( योगासन ) , विजय अपसिंगेकर (व्हॉलीबॉल ), मयूर मोटे (कबड्डी), प्रल्हाद जाधव आदी खेळाडू ंचा सन्मान रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन, व्होकेशनल सर्व्हिस चेअरमन राजेंद्र डेंगे ,क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी, रामदास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला . यावेळी खेळाडू ंना मार्गदर्शन करताना प्रा . राजेंद्र बरकसे यांनी खेळात करियरच्या संधी खूप आहेत . देश- विदेशात जाता येते, सांघिकता व एकतेची भावना वृद्धिंगत होते . यश अपयश पचवायची ताकत निर्माण होते . बुद्धिमत्ता वाढीस लागते . त्यामुळे किमान सायंकाळी तरी पालकांनी मुलांना ग्राऊंडवर पाठवावे, असे प्रतिपादन त्यांनी केले . खेळाडूंशी संवाद साधताना मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातील थरारक व रोमांचकारी अनुभव सांगून खेळामुळे राष्ट्र बळकट होते, असे मत क्लब प्रशासक गणेश कुलकर्णी यांनी मांडले . रोटरी क्लब ऑफ गेवराईचे सचिव प्रविण जैन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नाट्यश्री मासिक कविता स्पर्धेतील द्वितीय सत्राचा निकाल जाहीर.

## (राजरत्न पेटकर, सुनील बावणे, व रेखा बोरकर विजयी)

गडचिरोली : स्थानिक मनाट्यश्री साहित्य कला मंच, गडचिरोलीफ च्या वतीने मासिक उत्कृष्ट कवी व कविता हा नविन उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे. त्यानुसार दर महिन्याला ही स्पर्धा विनाशुल्क घेण्यात येते. या उपक्रमांतर्गत कवींना दिलेल्या विषयांवर कविता सादर करायची असून या कवितांमधून तीन उत्कृष्ट कवितांची निवड करण्यात येते. या कवितांना मासिक उत्कृष्ट कविता व कवीला उत्कृष्ट कवी म्हणून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने पुरस्कृत करण्यात येते. कविता संवर्धन व वाचनसंस्कृती जोपासणे हा स्पर्धेमागचा उद्देश असल्याने पुरस्कृत कवींना पुरस्कार म्हणून पुस्तके व आकर्षक प्रमाणपत्राने नाट्यश्री वार्षिक महोत्सवात मान्यवरांचे गौरविण्यात येते. या उपक्रमाचे द्वितीय सत्र नुकतेच पार पडले असून या सत्राकरीता मआषाढ वारी, श्रावण धारा, तसेच सण व उत्सवफ, असे तीन विषय देण्यात आले होते. यात ३८ कवींनी सहभाग नोंदवून दिलेल्या तीन विषयांवर एकूण ७९ कविता सादर केल्या होत्या. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून इंदिरानगर (गडचिरोली) येथील राजरत्न पेटकर यांच्या मआषाढ वारीफ या विषयावरील मविठ्ठलाफ या कवितेस प्रथम, बल्लारपूर (चंद्रपूर) येथील प्रसिद्ध कवी सुनील बावणे यांच्या मसण व उत्सवफ या विषयावरील मसणासुदीचा श्रावणफ या कवितेस द्वितीय व नागपूर येथील कवयित्री सौ. सुरेखा बोरकर यांच्या मश्रावणधाराफ या विषयावरील मश्रावण सरीफ या कवितेस तृतीय क्रमांकाचे पुरस्कार घोषित करण्यात आले आहे. असे नाट्यश्रीचे संचालक व नाटककार चुडाराम बल्हारपुरे, व कविता विभाग प्रमुख योगेश गोहणे यांनी







कळिवले आहे.

या स्पर्धेचे परिक्षण प्रसिद्ध समीक्षक प्रा. डॉ. जनबंधू मेश्राम, प्रसिद्ध कथाकार कवी प्रमोद बोरसरे व कविता विभाग प्रमुख योगेश गोहणे यांनी केले आहे.

कवींच्या या यशाबद्दल नाट्यश्री चे प्रा.अरुण बुरे, दादा चुधरी, दिलीप मेश्राम, प्रा. यादव गहाणे तसेच नाट्यश्रीच्या सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत प्रामुख्याने संजय कुनघाडकर, खेमदेव हस्ते, अशोक कांबळे,अतुल गंडाटे, रंजना चुधरी, प्रा. कृष्णा कुंभारे,नथ्थुजी चिमुरकर, राजेंद्र सोनटक्के, राजेश बारसागडे, सौ. वैजयंती गहूकर, अहिंसक दहिवले, उकंडराव राऊत, सिध्दार्थ गोवर्धन, रोशनी दाते, विलास जेंगठे, यामिनी मडावी, आत्माराम बर्डे, सुनील शेरकी, ज्योत्स्ना बन्सोड, डॉ. केशनी हटवार, पी.डी. काटकर, सुभाष धाराशिवकर, सुनील बावणे, बाबुलाल राठोड, राजरत्न पेटकर, सोनाली रायपुरे, वंदना मडावी, सुरेश गेडाम, प्रिती चहांदे, सुरेखा बोरकर, शैला चिमड्यालवार, हरिष नैताम, मधुकर दुफारे,मंगला कारेकर, पुरुषोत्तम दहिकर, वंदना सोरते,सुजाता अवचट व प्रा. सरिता बुटले इत्यादी कवींनी सहभाग नोंदविला होता.

या पुरस्काराचे वितरण नाट्यश्रीच्या पुढील वार्षिक कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

– चुडाराम बल्हारपुरे (नाटककार)

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बुधवार ३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# पुन्हा जी हुजूर म्हणा... OBC आरक्षण संपलं, लक्ष्मण हाकेंच्या मराठा आरक्षणावरील विधानाने खळबळ!

**मनोज जरांगे पाटलांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहे. सरकारच्या या निर्णयावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी संतप्त प्रतिक्रिया**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी सुरु केलेल्या उपोषणाला यश मिळाले आहे. मनोज जरांगे पाटलांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहे. जरांगे यांच्या मागणीनुसार राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच याबाबतचा निर्णयही जारी केला आहे. तसेच लवकरच सातारा संस्थानचे गॅझेटियर लागू होणार आहे. त्यामुळे आता लवकरच मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यास सुरुवात होणार आहे. सरकारच्या या निर्णयावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात.

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या सरकारच्या निर्णयावर बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले की, हा जीआर संविधान विरोधी आहे, ओबीसी समाजाचं आरक्षण संपवणारा हा निर्णय आहे. विरोधी निर्णय येऊन सुद्धा शासनाने सुप्रीम कोर्टांच्या गाईडलाईन, कोर्टात कंटेम्प करण्याचे काम केलेल आहे. मुळात शिंदे समितीचा अहवाल पक्षपाती करणारा आहे. तटस्थ राहून निर्णय घ्यायला हवा होता. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षण आज संपुष्टात आलेलं आहे. सरकार हतबल होतं, हतबलते पुढं ओबीसी आरक्षणाच्या नरडीचा घोट घेण्याचं कामं सरकारने केलं आहे. पुढे बोलताना हाके



म्हणाले की, 'या जीआरला स्टे लावणं, PIL दाखलं करणं गरजेचं आहे. आम्ही न्यायालयीन आणि रस्त्यावरची लढाई लढणार आहोत. OBC मध्ये 300-400 जाती आहेत. तुम्ही एकत्र येत नाहीत मान्य आहे. ही लढाई लढत असताना आम्ही वार झेलतोय, दगड पडतायत, आम्हाला खलनायक ठरवलं जातंय, आपण आता 200-300 वर्ष मागे नाही. बलुते आणि अलूते यांनी त्यांची त्यांची कामं करा, मेंढपाळांनी मेंढ्या राखा. वंजारी बांधवांनी ऊस तोडायला जा. बंजारा बांधवांनी तांडाच्या बाहेर येऊ नका. आपण परत गुलामीत जाणारं आहोत.' पुढच्या दरवाजातून एन्ट्री मिळत नाही, म्हणून मागून भगदाड पाडा, दरवाजा तोडून टाका आणि खुल्लम खुल्ला सगळं करा. ओबीसी म्हणजे महाराष्ट्रमधले सगळे असा या जीआरचा अर्थ निघतो. आज ओबीसी आरक्षण संपलेलं आहे.

ओबीसी बांधवांनो तुम्ही निर्णय घ्या आम्ही लढत आहे. शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहू. बाबासाहेब आंबेडकर, शाहू, महात्मा फुले यांना सामाजिक न्याय अपेक्षित होता.कुठलातरी चौथी पास माणूस येतो, शासनाच्या बोकांडी बसतो. शासन हतबल होऊन असा निर्णय घेत आहे. ओबीसींनो गावगाड्यात तुम्ही दुय्यम आहात, मागास आहात. सरपंच होण्याचा तुमचा मार्ग संपलेला आहे.
तुमच्या हातून तिरंगा झेंडा आता फडकवला जाणार नाही. सरकारने संविधान विरोधी निर्णय घेतलाय. उद्या गावातून आपल्याला हुसकवून लावलं जाईल.

# घोगस पारगांवचा प्रविण सगळे सेट परीक्षा उत्तीण

श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या घोगस पारगांवमधील सामान्य शेतकरी कुटुंबातील प्रविण नवनाथ सगळे याने मोठ्या मेहनतीने व जिद्दीने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणारी सेट उत्तीर्ण केली आहे. प्रविणचे दहावीपर्यंतचे शिक्षण माध्यमिक विद्यालय घोगस पारगाव येथे झाले. त्याने इयत्ता दहावीला ९१.८०% गुण मिळवले होते. त्यानंतर त्याचे अकरावी व बारावीचे शिक्षण सायन्स रेसिडेन्शियल जुनियर कॉलेज शेवगाव येथे झाले. बारावीला त्याने ७२% गुण घेत यशाची पायरी चढत असल्याची चुणूक दाखवून दिली होती. पुढे पदवी अभ्यासक्रमासाठी त्याने श्री संत भगवानबाबा महाविद्यालय, घाटशीळ पारगांव येथे प्रवेश घेऊन प्रथम श्रेणीने पदवी परीक्षा उत्तीर्ण झाला. पदव्युत्तर पदवीसाठी त्याने राज्यशास्त्र विषय घेऊन पुणे येथील मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स येथे प्रवेश घेतला. तेथे त्याने ७४% घेऊन पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यानंतर पुढे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणाऱ्या सेट परीक्षेचाही त्याने अभ्यास केला व त्यामध्ये ७२ गुण (कट ऑफ पेक्षा १३ गुण जास्त) घेऊन चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. यासोबतच सध्या तो स्पर्धा परीक्षा देण्यासाठी एमपीएससी व यूपीएससीचाही अभ्यास करत आहे. प्रवीणच्या या यशाबद्दल समस्त घोगस पारगांववकर ग्रामस्थांनी त्याचे व परिवाराचे तोंड भरून कौतुक केले. त्याने घेतलेली यशाची उंच भरारी नक्कीच इतर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आहे. या यशासाठी त्याला श्री. देवकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## आमचं सरकारसोबतचं वैर संपलं

मुंबईच्या आझाद मैदानावरील मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेले उपोषण अखेर संपुष्टात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने जरांगे यांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. या मागण्यांबाबत शासकीय आदेश (जीआर) जारी झाल्यानंतर जरांगे यांनी लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले.यावेळी बोलताना जरांगे म्हणाले, "आमचे सरकारसोबतचे वैर आता संपले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी येथे येऊन माझे उपोषण सोडवावे, अशी आमची इच्छा आहे." यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे यांना प्रथम उपोषण सोडण्याची विनंती केली



बीड। प्रतिनिधी गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रामध्ये सन आणि उत्सवाचे जे स्वरूप बदलत चालले आहे. ते अत्यंत भयावह आहे. उत्सवाचे स्वरुप बदलवून त्याला बिभीत्सपणा आणि अश्लिलतेचे स्वरुप दिले जात आहे. एकंदरीतच महाराष्ट्राची संस्कृती आपण कुठल्या दिशेने घेवून चाललोय याचा सर्वांनी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. परंतू यामध्येही फक्त गणेशोत्सव हा एकच असा उत्सव शिल्लक राहिला आहे.


# लिंबागणेशमध्ये मयुरेश्वराचे राजेशाही थाटात विसर्जन

**२२५ वर्षाची एक गाव एक गणपती परंपरा; गौरी बरोबरच गणेशाचे विसर्जन त्यामुळे गणेशोत्सव ५ दिवसांचा**

लिंबागणेश। प्रतिनिधी सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती तिर्थक्षेत्र असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात एक गाव - एक गणपती ची २२५ वर्षापासून परंपरा आहे. सरकार वाड्यात प्रतिष्ठापित मयुरेश्वर गणेशाची आज ता.२ मंगळवार रोजी आज दुपारी बारा वाजता मुख्य आरती केल्यानंतर छत्री, चौरी, अब्दगिरी, चामर, ध्वज, दंड अशा राजेशाही थाटात सरकार वाड्यातुन मयुरेश्वराची पालखीतुन विसर्जन मिरवणूक सुरू झाली. सरकार वाड्याच्या बाहेर आल्यानंतर बॅण्ड पथक, टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळींनी ठेका धरत तसेच ढोल ताशाच्या गजरात लेझीम पथकातील तरूणांनी आपले कसब दाखवले.मिरवणुकीसमोर परीट समाजातील बांधव धोतराच्या पायघड्या घालतात.मोरया हो मोरया जय गजानन मोरया चा जयघोष आसमंतात दुमदमला. मिरवणुकीत परीसरातील १२ गावातील लेझीम पथकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. रात्री ९ वाजता भालचंद्र गणपती मंदिराच्या चंद्र पुष्करणी तिर्थात महाआरतीनंतर विसर्जन करण्यात येते. मयुरेश्वराच्या विसर्जन मिरवणुकीत पालखी समोर धोतराच्या पायघड्या अंथरूण स्वागत करण्याचा मान परीट समाज बांधवांचा असतो तर गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी कैकाडवाड्यात सजवलेल्या बैलगाडीत मयुरेश्वराची मुर्ती पंचक्रोशीतील भक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येते. हा मान कैकाडी समाज बांधवांचा असतो. गणेशचतुर्थीला षोडशोपचार पुजा करून सरकार वाड्यात मयुरेश्वर गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते.वंशपरंपरेने उमेश कानिटकर ही गोजिरी मुर्ती तयार करतात. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी मुर्तिकाम सुरू होऊन श्रावण वैद्य त्रयोदशीला पुर्ण होते.पोळ्याच्या दुसऱ्या दिवसापासून रंगकाम सुरू होते. मयुरेश्वराच्या मुर्तीसाठी चिखलाचे गोळे पुरवण्याचा परंपरागत मान मुळुक गावचे महादेव आहेरकर यांचा आहे. मागील २२५ वर्षापासून लिंबागणेश गावाने एक गाव- एक गणपती परंपरा जपली आहे.गौरीबरोबरच गणेशाचे विसर्जन करण्याची इथे परंपरा असल्याने येथील गणेशोत्सव ५ दिवसांचा असतो. गावात दुसरीकडे सार्वजनिक गणपती बसवला जात नाही हे या गावचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नेकनुर ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लक्ष्मण आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बड ` , ,पोह.क्षीरसागर,घुंगरट, ढाकणे,खाडे यांच्यासह एकुण ३० पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मोदी युद्ध, मनी लॉन्ड्रिंग मशीन, भारताविरुद्ध इतकी गरळ ओकणारे हे नवारो कोण आहेत ?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे ट्रेड एडवायजर पीटर नवारो सध्या भारतविरोधी वक्तव्यांमुळे चर्चेत आहेत. नवारो यांनी 28 ऑगस्ट रोजी रशिया-युक्रेन संघर्षाला मोदी युद्ध म्हटलं होतं. नवारोंनी आरोप केलेला की, रशियाकडून तेल खरेदी करुन भारत या युद्धाला हवा देत आहे. 29 ऑगस्टला म्हणाले की, भारतावर टॅरिफ लावून पुतिन यांच्या वॉर मशीनला मिळणारी आर्थिक मदत रोखली.नवारो इतक्यावरच थांबले नाहीत, 31 ऑगस्ट रोजी ते म्हणाले की, भारत क्रेमलिनसाठी मनी लॉन्ड्रिंगच्या मशीन शिवाय काही नाही. तुम्ही पाहिलं असेल, ब्राह्मण भारतीय लोकांच्या खर्चावर फायदा कमवत आहेत. आता नवारो यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, चीन आणि रशियन राष्ट्रपतींच्या एकत्र भेटीवर आक्षेप आहे. ट्रम्प यांचे निष्ठावान हे नवारो कोण आहेत? कधीपासून व्यापार सल्लागार? पीटर केंट नवारो यांचा जन्म 15 जुलै 1949 रोजी मैसाचुसेट्सच्या केम्ब्रिज येथे झाला. ते अमेरिकी अर्थशास्त्री आहेत. जनवरी 2025 पासून ते ट्रम्प यांचे व्यापार सल्लागार आहेत. 2016 साली ट्रम्प यांच्या इलेक्शन कॅम्पेनमध्ये ते सोबत होते. आई-वडिलांचा घटस्फोट ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात व्हाइट हाउसमध्ये ते नॅशनल ट्रेड काऊन्सिल डायरेक्टर पदावर होते. नवारो यांचे वडील अल्बर्ट अल नवारो पेशाने संगीतकार होते. त्यांची आई एवलिन लिटिलजॉन, सॅक्स फिफ्थ एवेन्यूमध्ये सेक्रेटरी होती. आई-वडिलांच्या घटस्फोटानंतर नवारो आणि त्यांचा भाऊ आईसोबत मेरीलँड बेथेस्डा येथे एका छोट्या अपार्टमेंटमध्ये राहू लागला. यूनिवर्सिटीमधून स्कॉलरशिप नवारो यांना मॅसाचुसेट्स स्थित टफ्ट्स यूनिवर्सिटीमधून स्कॉलरशिप मिळाली. त्यांनी 1972 मध्ये ग्रॅजुएशन केलं. टफ्ट्समधून ग्रॅजुएशन केल्यानंतर नवारो अमेरिकी शांती सैन्यात सहभागी झाले. 1973 ते 1976 पर्यंत तीन वर्ष थायलंडमध्ये सर्विस केली. या दरम्यान लाओस, दक्षिण कोरिया, जापान, भारत, म्यानमार आणि मलेशियाचा दौरा केला. एडमिनिस्ट्रेशनमधून मास्टर्सची पदवी पीस कॉर्प्समध्ये सर्विस दिल्यानंतर नवारो यांनी हार्वर्ड



यूनिवर्सिटीमध्ये प्रवेश घेतला. 1979 मध्ये जॉन एफ. केनेडी स्कूलमधून पब्लिक एडमिनिस्ट्रेशनमधून मास्टर्सची पदवी घेतली. त्यानंतर हार्वर्डमधून अर्थशास्त्रात पीएचडीच शिक्षण घेतलं. 1986 साली अर्थशास्त्री रिचर्ड ई. केव्स के यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पूर्ण केली. पब्लिक पॉलिसीचे प्रोफेसर नवारो 1989 साली कॅलिफोर्निया यूनिवर्सिटीच्या पॉल मेरेज स्कूल ऑफ बिजनेस इकोनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसीचे प्रोफेसर बनले. दोन दशकापेक्षा अधिक काळ नवारो यांनी शिक्षकाच काम केलं. इकोनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसीशी संबंधित सिलेबससाठी नवारो यांनी अनेक एकेडमिक सुद्धा मिळाले. अनेक पुस्तकं लिहिली त्यांनी ऊर्जा नीती, व्यापार, विनियमन-मुक्ती आणि कॉर्पोरेट व्यवहार या विषयांवर रिसर्च केला. सोबतच अनेक पुस्तकं लिहिली. त्यांनी एक अर्थशास्त्री, लेखक आणि अमेरिकी व्यापार रणनीतिकार म्हणून ओळखलं जातं. चीनवर पुस्तक लिहिलं नवारो यांनी 2006 साली चीनवर एक पुस्तक लिहिलं. या पुस्तकाच नाव होतं, द कमिंग चायना वॉर्स. यात चीनच्या आर्थिक आणि सैन्य उदयामुळे जगासाठी काय धोके आहेत? त्या बद्दल लिहिलं आहे. यात अर्थव्यवस्थेपासून जलवायु परिवर्तनाचे मुद्दे देखील आहेत. नवारो यांनी पुस्तकात लिहिलय की, चीन हा देश व्यापारात दगा देतो. चार महिन्यांची जेल नवारो यांना अमेरिकी राष्ट्रपती निवडणुकी संदर्भात 2024 साली चार महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. काँग्रेसच्या अवमानना प्रकरणात जेलमध्ये जाणारे ते माजी व्हाइट हाऊस अधिकारी बनले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ

बुधवार ३ सप्टेंबर २०२५




मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला यश आल्यामुळे छत्रपती संभाजी नगर शहरात मराठा समाज बांधवांनी जल्लोष केला. पुंडलिक नगर भागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत मराठा बांधनांनी आनंद व्यक्त केला. काही लोकांनी कारच्या छतावर जाऊन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा फोटो हातात घेत गुलालाची उधळण करत आनंद साजरा केला.

# जिंकलो त रे राजा हो ,, हा विजय सर्व गरीब मराठ्या चा



## मराठ्यांसमोर सरकार झुकलं!

## जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू

मराठा आरक्षणाबाबत सुरू असलेले उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानही दिसत होते. उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मी आता रुग्णालयात जाणार आहे असंही त्यांना सांगितलं. पाच दिवसांच्या या उपोषणानंतर जरांगे पाटलांच्या बऱ्याच मागण्या मान्य झाल्या आहेत. उपोषण सोडल्यानंतर गणपतीची आरतीही करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीनेही मराठा समाजाचे आभार मानले.